## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**( दिनांक २९.०२.२०१६ सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली सर्व साधारण सभा)**

शनिवार, दि. ०२.७.२०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी,महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | पवळे उमेश देवराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | पांढरे स्नेहा सुधाकर |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खाँ इलीयास खाँ |
| आनेवार गंगासागर संदीप | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| भवरे किशोर दामोधर | कदम शिला सुनिल |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | कनकदंडे मोहिनी महेशराव |
| वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| चव्हाण श्रध्दा सुशिल | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| जिंदम पार्वती व्यंकटेश | उमरेकर अशोक रावण |
| मुदिराज कमलबाई रामस्वामी | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजिया बेगम अयुब खान | गाडगे शंकर जयवंतराव |
| देशमूख वैशाली मिलिंद | गायकवाड अंजली सुरेशराव |
| देशमूख बालासाहेब गंगाधराव | गफारखान गुलाम महमंद खान |
| धबाळे गणपतराव भिवाजी | अनुजा अमितसिंह तेहरा |
| यादव तुलजाराम गणेशलाल | खेडकर ज्योती महेंद्र |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | अ. फसीया फिरदोस |
| अ. सत्तार अ.गफुर | आसीया बेगम अ. हबीब बागवान |
| स. शेर अली स. महेबुब अली | कुरेशी चाँद पाशा खाजा |
| फारुख हुसेन कासीम साब | राखेवार सतिष शेषप्पा |
| चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस | जकिया बेगम स.मुखतार |
| गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल |
| लतीफा बेगम बु-हाण खान | किशोर किशनलाल यादव |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | सौ.ललिता मुंकुंदरा बोकारे |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| घोगरे इंदूबाई शिवाजीराव | कदम विश्वास बालाजी |
| अङ बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी अ,महापौर हे होते तसेच श्री समीर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (विकास), श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. स्मीता ठाकरे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री विजय मुंढे, प्र.उपायुक्त (महसुल), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता(साबांवि). श्री सुगीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**महापौर.** दि. २९.०२.२०१६ रोजीची सर्वानुमते तहकुब करण्यात मनपा सर्व साधारण सभेचे उर्वरीत कामकाजास सुरवात करण्यात येते.

**<u>पुरवणी विषय पत्रिका</u>**

**विषय क्र.१**

दि.२४.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. (अंदाजपत्रकीय विशेष सभा) दुपारी ३.०० वा..दि.२७.३.२०१५, दि.३१.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा.व साय.४.०० वा. (अंदाजपत्रकीय विशेष सभा), दि.२८.४.२०१५ .(महापौर उपमहापौर निवडणूक विशेष सभा) दि.४.६.२०१५, दि.७.७.२०१५ ( विशेष सभा) दि.२७.८.२०१५ दि.३१.१०.२०१५ व दि.३०.११.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करणे बाबत

**महापौर** इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. २८** **ठराव**

दि.२४.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. (अंदाजपत्रकीय विशेष सभा) दुपारी ३.०० वा..दि.२७.३.२०१५, दि.३१.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा.व साय.४.०० वा. (अंदाजपत्रकीय विशेष सभा), दि.२८.४.२०१५. (महापौर उपमहापौर निवडणूक विशेष सभा) दि.४.६.२०१५, दि.७.७.२०१५ ( विशेष सभा) दि.२७.८.२०१५ दि.३१.१०.२०१५ व दि.३०.११.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्र.२**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-१११६/प्र.क्र.२२/नवि-२० दि.१३ जानेवारीचे २०१६ चे परिपत्रकानूसार महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत चे परिपत्रकाची नोंद घेणे बाबत. .(सोबत शासन परिपत्रक जोडले आहे.)

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**(२)**

**ठराव क्रं. २९** **ठराव**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-१११६/प्र.क्र.२२/नवि-२० दि.१३ जानेवारीचे २०१६ चे परिपत्रकानूसार महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत चे परिपत्रकाची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.३**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-१११६/प्र.क्र.२२/नवि-२० दि.२३ फेब्रुवारी २०१६ चे परिपत्रकानूसार महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत चे परिपत्रकाची नोंद घेणे बाबत.(सोबत शाससन परिपत्रक जोडले आहे.)

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. ३०** **ठराव**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-१११६/प्र.क्र.२२/नवि-२० दि.२३ फेब्रुवारी २०१६ चे परिपत्रकानूसार महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत चे परिपत्रकाची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.४**

महाराष्ट्र शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. नावाशमनपा-२०१५/प्र.क्र.२०/नवि-२४ दि.२३ फेब्रूवारी २०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत आयात होणा-या मालावर स्थानिक संस्था कर रध्द करण्याची तसेच यावर पर्याय म्हणून जकात कर व मुल्यावर्धीत कर आकारण्यात येवू नये अशी शिफारस करण्यात आलेला नांवामनपाकेचा ठराव क्र.५२ दि.१९.७.२०१४ हा ४५१(१) नुसार प्रथमत: एका महिण्याच्या कालावधीसाठी विखंडीत करण्यात आलेला आहे. (सोबत शासन निर्णय जोडला आहे.)

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. ३१** **ठराव**

महाराष्ट्र शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. नावाशमनपा-२०१५/प्र.क्र.२०/नवि-२४ दि.२३ फेब्रूवारी २०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत आयात होणा-या मालावर स्थानिक संस्था कर रध्द करण्याची तसेच यावर पर्याय म्हणून जकात कर व मुल्यावर्धीत कर आकारण्यात येवू नये अशी शिफारस करण्यात आलेला नांवामनपाकेचा ठराव क्र.५२ दि.१९.७.२०१४ हा ४५१(१) नुसार प्रथमत: एका महिण्याच्या कालावधीसाठी विखंडीत करण्यात आलेला असुन त्याची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.५**

शासन निर्णय क्र. मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.५ फेब्रूवारी २०१६ नुसार नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ फेब्रूवारी २०१६ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनावरील अधिक ग्रेड पे ११९ या दराने महागाई भत्ता लागू करणेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/१३७१५/२०१६ दि.२० फेबूवारी २०१६ अन्वये देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. ३२** **ठराव**

शासन निर्णय क्र. मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.५ फेब्रूवारी २०१६ नुसार नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ फेब्रूवारी २०१६ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनावरील अधिक ग्रेड पे ११९ या दराने महागाई भत्ता लागू करणेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/१३७१५/२०१६ दि.२० फेब्रूवारी २०१६ अन्वये देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली त्याची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.६**

महाराष्ट्र शासन सार्वजनीक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः उष्माघात 2015/प्र.क्र.223/अ-5 तारीखः 19 ऑक्टोंबर, 2015 चे परिपत्रकानुसार राज्यातील नागपूर, चंद्रपूर, गोंदीया, अकोला, नांदेड व जळगाव या जिल्ह्यात/ महानगरपालिका क्षेत्राकरीता उष्माघात कृती अराखडा (Heat Action Plan) अमलबजावणी करणेबाबत

(सोबत शाससन परिपत्रक जोडले आहे.)

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. ३३** **ठराव**

महाराष्ट्र शासन सार्वजनीक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः उष्माघात 2015/प्र.क्र.223/अ-5 तारीखः 19 ऑक्टोंबर, 2015 चे परिपत्रकानुसार राज्यातील नागपूर, चंद्रपूर, गोंदीया, अकोला, नांदेड व जळगाव या जिल्ह्यात/ महानगरपालिका क्षेत्राकरीता उष्माघात कृती अराखडा (Heat Action Plan) अमलबजावणी करण्यात आली त्याची नोंद ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र. ७**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -2015/ प्र.क्र. 80/ नवि-16 तंत्रालय, मुंबई-32 दिनांक 17 नोव्हेंबर 2015 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील महानगरपालिकाक्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी`` महानगरपालिकेस रु.2.10 कोटी वितरीत करण्यात आले असुन महापालिकेचा तेवढाच सहभाग रु. 2.10 कोटी असे एकुण रु.4.20 कोटी रक्कमेतुन मुलभुत सोई सुविधा पुरविणे अंतर्गतची कामे प्रस्तावित करण्यात येत असुन शासन निर्णय क्र. जीईएन-2008/ प्र.क्र.08/ नवि-16 मुंबई 32 दिनांक 29 ऑगष्ट 2008 नुसार जिल्हास्तरीय समितीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे.

मुलभूत संविधाच्या विकासाठी रु.4.20 कोटीच्या प्रस्तावित कामाच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी मार्फत जिल्हास्तरीय समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यास व शासन निर्णय नुसार महानगरपालिकेच्या 50 % हिश्याची रक्कम रु.2.10 कोटी महानगरपालिकेत निधी उपलब्धते नुसार वर्ग करुन प्राधाण्याने कामे हाती घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** सदरील विषयवर दिनांक २९.०२.२०१६ रोजी निर्णय घेण्यात आलेला असुन सदरचा विषय वगळण्यात येतो

**विषय क्र.८**

**सर्वांसाठी घरे** संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना केंद्र शासनाने दि. 25.06.2015 रोजी व त्याअनुषंगाने राज्यशासनाने महाराष्ट्रातील 51 शहरांमध्ये सदर योजना राबविण्यासाठी शासन निर्णय क्र.प्रआयो.2015/प्र.क्र.110/गृनिधो-2(सेल) दि. 09.12.2015 अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. सदर योजनेमध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजना महानगरपालिका क्षेत्रामध्ये राबविणे आवश्यक आहे. सदर योजनेची खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.



**केंद्रशासनाचा अंमलबजावणी विभागः-** गृहनिर्माण व नागरी गरिबी निर्मुलन मंत्रालय, नवी दिल्ली.

**राज्य शासनाचा अंमलबजावणी विभागः–** गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**राज्यस्तरीय समन्वय समितीः–** म्हाडा, मुंबई.

1. सर्वांसाठी घरे अभियान हे वर्ष 2015 ते 2022 दरम्यान राबविण्यात येणार आहे.
2. सदर अभियाना अंतर्गत 30 चौ.मी. (323 चौ.फुट) क्षेत्रफळ असलेले घरकुल बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.
3. पुनर्वसन प्रकल्पामध्ये मुलभुत नागरी सुविधांसाठी निधी मिळेल.
4. सदर योजनेमध्ये बांधण्यात येणारे घरकुल महिला कुटूंब प्रमुख यांच्या नावे करण्याचे प्रस्तावित आहे.
5. सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करणे व वार्षिक अंमलबजावणीसाठी नियोजन करणे आवश्यक आहे.
6. सदर योजनेचा 5 टक्के निधी योजनेचे सक्षमीकरण, माहिती, प्रशिक्षण आणि दळणवळण (IEC) व प्रशासकीय व इतर खर्चासाठी (A & OE) वापरता येईल.

**अंमलबजावणी व कार्यपध्दतीः**

सदर योजना खालील चार घटकांत राबविली जाणार आहे.

**घटक क्र.1 – झोपडपट्टीवासियांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे.**

1. खाजगी व शासकीय जमिनीवरील झोपड्यांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे.

2. केंद्रशासनाचे अनुदान रु. 1 लक्ष प्रति घरकुल राहील.
3. राज्य शासनाचे अनुदान रु. 1 लक्ष प्रति घरकुल राहील.

4. सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा महानगरपालिकेने तयार करुन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

5. सदर योजनेअंतर्गत निवडण्यात आलेल्या झोपडपट्टयामधील प्रकल्पांसाठी आवश्यकता असल्यास विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करुन मंजुरी घेण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

6. राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समितीस प्रति घरकुल राज्याच्या अनुदानामध्ये 25 टक्के बदल करण्याचे अधिकार राहतील.

**घटक क्र.2 – कर्ज सलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातुन आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांसाठी (EWS) व अल्प उत्पन्न गटातील घटकांसाठी (LIG) घरांची निर्मीती करणे.**

1. ही योजना राज्यातील सर्व क्षेत्रात राबविली जाईल.

2. सदर घटकांअंतर्गत 15 वर्षाकरिता घेण्यात आलेल्या रु. 6 लक्ष पर्यंतच्या कर्जावर 6.5 % व्याजाची आकारणी बँकामार्फत करण्यात येईल व रु. 6 लक्षपेक्षा जास्तीच्या कर्जावर बँकेच्या नियमानुसार व्याजदर आकारणी केली जाईल.

3. सदर योजना बँकामार्फत राबविण्यात येणार असुन जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय बँकर्स समिती मार्फत संनियंत्रण होईल.

**घटक क्र.3 – भागीदारी तत्वावर परवडणा-या घरांची निर्मिती करणे.**

1. सदर योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील (EWS) व्यक्तीकरिता घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट आहे.

2. सदर घटकाअंतर्गत केंद्र शासनाचे रु.1.50 लक्ष व राज्य शासनाचे रु.1 लक्ष अनुदान राहील.

3. 30 चौ.मी. म्हणजेच 323 चौ. फुट चटईक्षेत्र असलेले घरकुल बांधणे प्रस्तावित आहे.

4. या प्रकल्पामध्ये किमान 250 घरकुलांचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामधील किमान 35 % घरे आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांसाठी (EWS) असणे आवश्यक आहे.

**घटक क्र.4 – आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील (EWS) लाभार्थींना वैयक्तीक घरकुल बांधण्यास अनुदान:**

1. EWS लाभार्थ्यांसाठी नविन घरकुल बांधणे अथवा अर्धवट घरकुल पुर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडुन रु.1.50 लक्ष व राज्य शासनाकडुन रु. 01 लक्ष प्रति घरकुल अनुदान राहील.

2. झोपडपट्टी बाहेरील लाभार्थीना लाभ देणे शक्य आहे.

3. जागेच्या मालकीबाबत सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

**लाभार्थ्यांच्या निवडीबद्दल अटी:**

1. घटक क्र.1 मधील लाभार्थ्यांची पात्रता महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम 1971 मधील तरतुदीनुसार राहील.

2. उत्पन्नाची मर्यादा आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांसाठी (EWS) रु.3,00,000/- पर्यंत राहील व अल्प उत्पन्न गटातील घटकांसाठी (LIG) रु.6,00,000/- पर्यंत राहील.

3. लाभार्थ्यांच्या कुटूंबाचे भारतात कोठेही पक्के घर नसावे.

4. झोपडपट्टीचे निवड करत असताना किमान 300 लोकसंख्या किंवा 60 ते 70 झोपड्यांचे एकत्रित क्षेत्र असणे आवश्यक आहे.

5. लाभार्थी वरील प्रमाणे योजनेमधील एकाच घटकाचा लाभ घेवू शकतो.

सदर योजनेची केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्वे http://mhupa.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत व राज्यशासनाचा शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत “सर्वांसाठी घरे” प्रधानमंत्री आवास योजनेची केंद्र शासन व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबावणी करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ३४** **ठराव**

**सर्वांसाठी घरे** संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना केंद्र शासनाने दि. 25.06.2015 रोजी व त्याअनुषंगाने राज्यशासनाने महाराष्ट्रातील 51 शहरांमध्ये सदर योजना राबविण्यासाठी शासन निर्णय क्र.प्रआयो.2015/प्र.क्र.110/गृनिधो-2(सेल) दि. 09.12.2015 अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. सदर योजनेमध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजना महानगरपालिका क्षेत्रामध्ये राबविणे आवश्यक आहे. सदर योजनेची खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

**(४)**

**केंद्रशासनाचा अंमलबजावणी विभाग:-** गृहनिर्माण व नागरी गरिबी निर्मुलन मंत्रालय, नवी दिल्ली.

**राज्य शासनाचा अंमलबजावणी विभाग:–** गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**राज्यस्तरीय समन्वय समिती:-** म्हाडा, मुंबई.

1. सर्वांसाठी घरे अभियान हे वर्ष 2015 ते 2022 दरम्यान राबविण्यात येणार आहे.
2. सदर अभियाना अंतर्गत 30 चौ.मी. (323 चौ.फुट) क्षेत्रफळ असलेले घरकुल बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.
3. पुनर्वसन प्रकल्पामध्ये मुलभुत नागरी सुविधांसाठी निधी मिळेल.
4. सदर योजनेमध्ये बांधण्यात येणारे घरकुल महिला कुटूंब प्रमुख यांच्या नावे करण्याचे प्रस्तावित आहे.
5. सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करणे व वार्षिक अंमलबजावणीसाठी नियोजन करणे आवश्यक आहे.
6. सदर योजनेचा 5 टक्के निधी योजनेचे सक्षमीकरण, माहिती, प्रशिक्षण आणि दळणवळण (IEC) व प्रशासकीय व इतर खर्चासाठी (A & OE) वापरता येईल.

**अंमलबजावणी व कार्यपध्दती:**

सदर योजना खालील चार घटकांत राबविली जाणार आहे.

**घटक क्र.1 - झोपडपट्टीवासियांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे.**

1. खाजगी व शासकीय जमिनीवरील झोपड्यांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे.
2. केंद्रशासनाचे अनुदान रु. 1 लक्ष प्रति घरकुल राहील.
3. राज्य शासनाचे अनुदान रु. 1 लक्ष प्रति घरकुल राहील.
4. सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा महानगरपालिकेने तयार करुन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.
5. सदर योजनेअंतर्गत निवडण्यात आलेल्या झोपडपट्टयामधील प्रकल्पांसाठी आवश्यकता असल्यास विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करुन मंजुरी घेण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.
6. राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समितीस प्रति घरकुल राज्याच्या अनुदानामध्ये 25 टक्के बदल करण्याचे अधिकार राहतील.

**घटक क्र.2 - कर्ज सलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातुन आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांसाठी (EWS) व अल्प उत्पन्न गटातील घटकांसाठी (LIG) घरांची निर्मीती करणे.**

1. ही योजना राज्यातील सर्व क्षेत्रात राबविली जाईल.
2. सदर घटकांअंतर्गत 15 वर्षाकरिता घेण्यात आलेल्या रु. 6 लक्ष पर्यंतच्या कर्जावर 6.5 % व्याजाची आकारणी बँकामार्फत करण्यात येईल व रु. 6 लक्षपेक्षा जास्तीच्या कर्जावर बँकेच्या नियमानुसार व्याजदर आकारणी केली जाईल.
3. सदर योजना बँकामार्फत राबविण्यात येणार असुन जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय बँकर्स समिती मार्फत संनियंत्रण होईल.

**घटक क्र.3 - भागीदारी तत्वावर परवडणा-या घरांची निर्मिती करणे.**

1. सदर योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील (EWS) व्यक्तीकरिता घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट आहे.
2. सदर घटकाअंतर्गत केंद्र शासनाचे रु.1.50 लक्ष व राज्य शासनाचे रु.1 लक्ष अनुदान राहील.
3. 30 चौ.मी. म्हणजेच 323 चौ. फुट चटईक्षेत्र असलेले घरकुल बांधणे प्रस्तावित आहे.
4. या प्रकल्पामध्ये किमान 250 घरकुलांचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामधील किमान 35 % घरे आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांसाठी (EWS) असणे आवश्यक आहे.

**घटक क्र.4 - आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील (EWS) लाभार्थींना वैयक्तीक घरकुल बांधण्यास अनुदान:**

1. EWS लाभार्थ्यांसाठी नविन घरकुल बांधणे अथवा अर्धवट घरकुल पुर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडुन रु.1.50 लक्ष व राज्य शासनाकडुन रु. 01 लक्ष प्रति घरकुल अनुदान राहील.
2. झोपडपट्टी बाहेरील लाभार्थींना लाभ देणे शक्य आहे.
3. जागेच्या मालकीबाबत सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

**लाभार्थ्यांच्या निवडीबद्दल अटी:**

1. घटक क्र.1 मधील लाभार्थ्यांची पात्रता महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम 1971 मधील तरतुदीनुसार राहील.
2. उत्पन्नाची मर्यादा आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांसाठी (EWS) रु.3,00,000/- पर्यंत राहील व अल्प उत्पन्न गटातील घटकांसाठी (LIG) रु.6,00,000/- पर्यंत राहील.
3. लाभार्थ्यांच्या कुटूंबाचे भारतात कोठेही पक्के घर नसावे.
4. झोपडपट्टीचे निवड करत असताना किमान 300 लोकसंख्या किंवा 60 ते 70 झोपड्यांचे एकत्रित क्षेत्र असणे आवश्यक आहे.
5. लाभार्थी वरील प्रमाणे योजनेमधील एकाच घटकाचा लाभ घेवू शकतो.

सदर योजनेची केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्वे http://mhupa.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत व राज्यशासनाचा शासन निर्णय

www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत "सर्वांसाठी घरे" प्रधानमंत्री आवास योजनेची केंद्र शासन व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबावणी करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.९**

**विषयः-** घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ओल्या कच-यापासून सेंद्रीय खत निर्माण करण्याचा प्रकल्प भागीदारी तत्वावर राबविणे बाबत.

**संदर्भः-** 1. या कार्यालयाचे पत्र क्र.नांवाशमनपा/स्वमअ/9448/2015 दि.20 ऑक्टो,2015

2. म.न.पा. सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्र.106 दि.05.01.2016

**(५)**

महानगरपालिका हद्दीतील ओला कचरा, भाजीपाला मार्केट येथील वेस्ट, हॉटेलचे वेस्ट या सर्वांवर प्रक्रीया करुन सेंद्रीय खत निर्माण करण्याचा पर्याय उपलब्ध असून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे प्रायोगीक तत्वावर भागीदारी तत्वावर यासाठी एक प्लांट उभारण्याचा मानस आहे. त्यासाठी निवीदा मागविणे सर्वात कमी दराच्या निविदा धारकासोबत वाटाघाटी करुन प्रकल्प उभारण्यासाठी व सेंद्रीय खत निर्माण करणे निर्माण झालेल्या सेंद्रीय खताची विक्री करणे यासाठी प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून सदरील कार्यवाही करण्यासाठी लागणा-या खर्चास 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खर्च करण्याची व सर्व प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव संदर्भ क्र.1 अन्वये दाखल केला होता.

सदंर्भ क्र.2 अन्वये सर्वसाधारण सभा ठराव क्र.106 दि.05.01.2016 अन्वये या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) खर्चाचे अंदाजपत्रकासह तयार करुन त्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. असे ही नावामनपाने सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो असा ठराव पारीत केलेला आहे.

सदरील प्रस्ताव हा प्रायोगीक तत्वावर भागीदारी प्रकल्पातून उभारावयाचा असून या क्षेत्रात काम करणा-या संस्थेसोबत हा प्रकल्प उभारावयाचा असल्यामुळे या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल (डीपीआर) करणे शक्य नसल्यामुळे संदर्भ क्र.1 अन्वये सादर केल्याप्रमाणे मान्यतेसाठी हा विषय सर्वसाधारण सभेसमोर तातडीने ठेवण्यात यावा.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. ३५** **ठराव**

**विषयः-** घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ओल्या कच-यापासून सेंद्रीय खत निर्माण करण्याचा प्रकल्प भागीदारी तत्वावर राबविणे बाबत.

**संदर्भः-** 1. या कार्यालयाचे पत्र क्र.नांवाशमनपा/स्वमअ/9448/2015 दि.20 ऑक्टो,2015

2. म.न.पा. सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्र.106 दि.05.01.2016

महानगरपालिका हद्दीतील ओला कचरा, भाजीपाला मार्केट येथील वेस्ट, हॉटेलचे वेस्ट या सर्वांवर प्रक्रीया करुन सेंद्रीय खत निर्माण करण्याचा पर्याय उपलब्ध असून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे प्रायोगीक तत्वावर भागीदारी तत्वावर यासाठी एक प्लांट उभारण्याचा मानस आहे. त्यासाठी निवीदा मागविणे सर्वात कमी दराच्या निविदा धारकासोबत वाटाघाटी करुन प्रकल्प उभारण्यासाठी व सेंद्रीय खत निर्माण करणे निर्माण झालेल्या सेंद्रीय खताची विक्री करणे यासाठी प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून सदरील कार्यवाही करण्यासाठी लागणा-या खर्चास 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खर्च करण्याची व सर्व प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव संदर्भ क्र.1 अन्वये दाखल केला होता.

सदंर्भ क्र.2 अन्वये सर्वसाधारण सभा ठराव क्र.106 दि.05.01.2016 अन्वये या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) खर्चाचे अंदाजपत्रकासह तयार करुन त्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. असे ही नावामनपाने सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो असा ठराव पारीत केलेला आहे.

सदरील प्रस्ताव हा प्रायोगीक तत्वावर भागीदारी प्रकल्पातून उभारावयाचा असून या क्षेत्रात काम करणा-या संस्थेसोबत हा प्रकल्प उभारावयाचा असल्यामुळे या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल (डीपीआर) करणे शक्य नसल्यामुळे कार्यालयाचे पत्र क्र.नांवाशमनपा/स्वमअ/9448/2015 दि.20 ऑक्टो,2015 अन्वये सादर केल्याप्रमाणे त्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१०**

**विषयः-** ओल्या विघटनशिल कच-यापासून बायोगॅस विज प्रकल्प उभारणे व घनकच-यातील सर्व प्रकारचे प्लास्टीक वेगवेगळेकरुन त्यावर प्रक्रिया करणे बाबत.

**संदर्भः-** 1. या कार्यालयाचे पत्र क्र.नांवाशमनपा/स्वमअ/10995/2015 दि.27 नोव्हें,2015

2. म.न.पा. सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्र.90 दि.30.11.2015

नांदेड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीणे प्लास्टीक प्रोसेसींग युनिट स्थापन करणे व नांदेड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीणे किचन वेस्ट स्पेशल बायोगॅस प्रकल्प उभारणे या कामासाठी जिल्हा वार्षिक योजने मधील नाविन्यपुर्ण योजने

अंतर्गत या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रत्येकी 150 लक्ष प्रती काम असे एकुण रु.300 चे लक्षच्या निधीस मान्यता प्राप्त झालेली आहे. या दोन प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी प्राप्त निधीतील निधी कमी पडल्यास 14 व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतून या योजनेतील कामावर खर्च करण्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव संदर्भ क्र.1 अन्वये सर्वसाधारण सभेसमोर सादर केला होता.

सदंर्भ क्र.2 अन्वये सर्वसाधारण सभा ठराव क्र.90 दि.30.11.2015 अन्वये या दोन्ही प्रकल्पाची अंमलबजावणी प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करुन त्यासह हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. असे ही नावामनपाने सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो असा ठराव पारीत केलेला आहे.

या सोबत दोन्ही कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल सोबत सादर करण्यात येत असून संदर्भ क्र.1 अन्वये सादर केल्याप्रमाणे मान्यतेसाठी हा विषय सर्वसाधारण सभेसमोर तातडीने ठेवण्यात यावा.

**प्र. उपआयुक्त (स्वमअ)** कार्यालयीन पत्र क्रं. स्वमअ/१००७/१६ दिनांक २६.०४.२०१६ अन्वये जिल्हा नियोजन समितीने प्रशासकिय मान्यता आदेशात अटी व शर्ती मधील अट क्रं. १९ अन्वये प्राप्त झालेला निधी दि. ३१.०३.१६ पर्यंत खर्च होणे शक्य नसल्यामुळे प्राप्त झालेला निधी दिनांक २३.०३.१६ रोजी नियोजन समितीस परत केलेला आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासना मार्फत परत घेण्यात येत असुन सदरचा विषय, विषय पत्रिकेवरुन वगळण्यात यावा अशी विनंती आहे.

**महापौर** प्रशासनाने आपला प्रस्ताव मागे घेतल्यामुळे सदरचा प्रस्ताव विषयपत्रिकेवरुन वगळण्यात येतो.

**विषय क्र.११**

बिएसयुपी योजनेअंतर्गत साईट क्र.34 श्रावस्तीनगर येथे विकास कामात बाधीत व अतिक्रमित मालमत्ता धारकांचे पूनर्वसन करणेसाठी एकुण 877 घरकुलाचे बांधकाम करण्यात आले असुन त्यापैकी आतापर्यंत 480 घरकुलांचे वाटप विकास कामात बाधीतांना व अतिक्रमितांना करण्यात आले आहेत. तसेच आठ युनिटमध्ये मनपा मार्फत दवाखाना कार्यरत आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणी 397 एवढी घरकुल वाटपा अभावी रिकामी आहेत व ती घरकुले जस जसे लाभार्थी उपलब्ध होतील तशी तशी वाटप करण्याचे प्रायोजन आहे परंतु असे निदर्शनास आले आहे की सदरील बांधून पूर्ण करण्यात आलेल्या घरकुलांची नासधूस मोठया प्रमाणात होत आहे. ज्यामध्ये खिडकी/ दरवाजे / किचन ओटे/ सिंक / लाईट फिटिंग / पाण्याच्या टाकी इत्यादी बाबींचा समावेश आहे. त्यामुळे नासधूस दुरुस्ती खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडत आहे. या बाबीचा विचार करता महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले जे कर्मचारी त्यांना स्वत:चे घर नसल्याने ईतरत्र ठिकाणी किरायाने राहत आहेत ते कर्मचारी साईट क्र.34 येथे रिकामी असलेली घरकुले वाटप होईपर्यंत भाडे तत्वावर निवासासाठी देण्याची मागणी करीत आहेत.



त्यानुसार एक धोरणात्मक बाब म्हणुन सदरील घरकुले ईच्छूक कर्मचा-यांना भाडे तत्वावर दिल्यास घरकुलाच्या नासधूसीचे प्रकार रोखण्यास मदत होईल व घरे सुरक्षित/ सुस्थितीत राहतील व आर्थिक नुकसान होणार नाही. याउलट त्यापासुन आर्थिक उत्पन्न मिळेल.

करिता साईट क्र.34 येथिल शिल्लक असलेली घरकुल महानगरपालिका ईच्छूक कर्मचा-यांना नियमानुसार, वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे व घराच्या प्रकारानुसार प्रचलित दराप्रमाणे भाडे आकारुन देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव ठेवण्यात यावा.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ३६** **ठराव**

बिएसयुपी योजनेअंतर्गत साईट क्र.34 श्रावस्तीनगर येथे विकास कामात बाधीत व अतिक्रमित मालमत्ता धारकांचे पूनर्वसन करणेसाठी एकुण 877 घरकुलाचे बांधकाम करण्यात आले असुन त्यापैकी आतापर्यंत 480 घरकुलांचे वाटप विकास कामात बाधीतांना व अतिक्रमितांना करण्यात आले आहेत. तसेच आठ युनिटमध्ये मनपा मार्फत दवाखाना कार्यरत आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणी 397 एवढी घरकुल वाटपा अभावी रिकामी आहेत व ती घरकुले जस जसे लाभार्थी उपलब्ध होतील तशी तशी वाटप करण्याचे प्रायोजन आहे परंतु असे निदर्शनास आले आहे की सदरील बांधून पूर्ण करण्यात आलेल्या घरकुलांची नासधूस मोठया प्रमाणात होत आहे. ज्यामध्ये खिडकी/ दरवाजे / किचन ओटे/ सिंक / लाईट फिटिंग / पाण्याच्या टाकी इत्यादी बाबींचा समावेश आहे. त्यामुळे नासधूस दुरुस्ती खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडत आहे. या बाबीचा विचार करता महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले जे कर्मचारी त्यांना स्वत:चे घर नसल्याने ईतरत्र ठिकाणी किरायाने राहत आहेत ते कर्मचारी साईट क्र.34 येथे रिकामी असलेली घरकुले वाटप होईपर्यंत भाडे तत्वावर निवासासाठी देण्याची मागणी करीत आहेत.

त्यानुसार एक धोरणात्मक बाब म्हणुन सदरील घरकुले ईच्छूक कर्मचा-यांना भाडे तत्वावर दिल्यास घरकुलाच्या नासधूसीचे प्रकार रोखण्यास मदत होईल व घरे सुरक्षित/ सुस्थितीत राहतील व आर्थिक नुकसान होणार नाही. याउलट त्यापासुन आर्थिक उत्पन्न मिळेल.

करिता साईट क्र.34 येथिल शिल्लक असलेली घरकुल महानगरपालिका ईच्छूक कर्मचा-यांना नियमानुसार, वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे व घराच्या प्रकारानुसार प्रचलित दराप्रमाणे भाडे आकारण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१२**

नांवामनपा हध्दीतील राष्ट्रीय नदीकृती योजने अंतर्गत देगलूर नाका (जूना पुल) ( N.R.A.P.) येथे प्रकल्प असून त्या ठिकाणी 300 HP पंपसेट ०३, १५० HP पंपसेट – ०२, ३८० Kva Diesel generator Set-2, 630 Kva transformer- 2 तसेच Air blower ,600 mm dia sluice valve , non retirn valve व 450 mm dia चे sluice valve, non retirn valve wash out valve, Air valve, activetor valve ई.मशिनरी आहेत,

सदरील N.R.A.P. प्रकल्प हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत बांधकाम करण्यात आला असून सदरील प्रकल्प त्या विभागाकडून सन २०१०-२०११ मध्ये एकतर्फी हस्तांतरण करण्यात आला होता त्यानंतर मनपा कडून जून २०११ मध्ये ३०० HP पंपसेट , एक १५० HP पंपसेट चालू करुन तो प्रकल्प चालू करण्याचा प्रयत्न केला होता,ख पण कालांतराने प्रकल्प बंद पडला तसेच तो दि.६ फेबूवारी २०१६ रोजी एक पंपसेट चालू करण्यात आला असून विहिरीत येणा-या अत्यल्प पाण्याअभावी पंप चालू करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

या प्रकल्पाच्या विहिरीमध्ये गाळ असल्याने ७०० mm ,९०० mm १२00 mm मुख्य मलवाहिणी लाईनमध्ये गाळ साचल्याने विहिरीमधे अत्यल्प प्रमाणात येत आहे तसेच या प्रकल्पाला शहरातील सांडपाण्याचे एकूण १९ नाले जोडण्यात आले असल्याने त्या नाल्यामधून वाहून आलेल प्लॉस्टीक वस्तू,कपडे गाळ कचरा ई. प्रकल्पातील विहिरीत तसेच मुख्य मलवाहिनीमध्ये पाणी येण्यास अडचण निर्माण झाली आहे. त्यामूळे प्रकल्प बंद आहे. यापुर्वी सदरील प्रकल्पाच्या विहिरीतील गाळ काढण्यासाठी अनेकदा निविदा मागविण्यात आल्या होत्या परतु कत्राटदाराकडून निविदा खरेदी बाबत प्रतिसाद मिळाला नसल्याने गाळ काढणे तसेच राहिले आहे.

मनपा हध्दीतील SPS व STP हे प्रकल्प देखभाल व दुरुस्तीसाठी मे.प्रगती कन्स्ट्र.चाकूर यांना दि. १२ जानेवारी २०१५ पासून ( N.R.A.P शिवाय) देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आलेले आहेत. परंतू N.R.A.P प्रकल्प हा बंद अवस्थेत असल्याने त्यांच्याकडे हस्तांतरीत केला नव्हता तथापी तो दि. १.१०.२०१५ रोजी बंद अवस्थेत देखभालीसाठी त्यांच्याकडे देण्यात आला आहे.

सदरील प्रकल्प चालू करण्यासाठी विहिरीतील गाळ काढणे प्रकल्पातील उपलब्ध्द मशिनरी दुरुस्त करणे गोदावरी पात्रातील मुख्य मलवाहिनी वरील एकूण ५९ चेंबरची उंची १ ते १.५ मी.वाढविण्यो व चेंबरची दुरुस्ती करणे,काही चेबर नविन बांधकाम करणे,चंबरर्सवर नविन, फ्रेम कव्हर टाकणे,अंदाजे २.५ कि.मी.मुख्य मलवाहिनी मधील गाळ साफ करणे व प्रकल्पातील अस्तित्वात असलेली संपूर्ण ना दुरुस्त मशिनरी चालू करणे या कामासाठी अंदाजे १.२९ कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च गोदावरी शुध्दीकरण करणेसाठी व हे प्रकल्प चालू करण्यासाठी १४ व्या वित्त आयोगातून दुरुस्तीचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

करीता सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्य्ता देणेकरीता सालसन २०१५-२०१६ च्या १४ व्या वित्त आयोगाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खर्च करण्यासाठी मान्यता देणे बाबत.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ३७** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील राष्ट्रीय नदीकृती योजने अंतर्गत देगलूर नाका (जूना पुल) ( N.R.A.P.) येथे प्रकल्प असून त्या ठिकाणी 300 HP पंपसेट ०३, १५० HP पंपसेट – ०२, ३८० Kva Diesel generator Set-2, 630 Kva transformer- 2 तसेच Air blower ,600 mm dia sluice valve , non retirn valve व 450 mm dia चे sluice valve, non retirn valve wash out valve, Air valve, activetor valve ई.मशिनरी आहेत,

सदरील N.R.A.P. प्रकल्प हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत बांधकाम करण्यात आला असून सदरील प्रकल्प त्या विभागाकडून सन २०१०-२०११ मध्ये एकतर्फी हस्तांतरण करण्यात आला होता त्यानंतर मनपा कडून जून २०११ मध्ये ३०० HP पंपसेट , एक १५० HP पंपसेट चालू करुन तो प्रकल्प चालू करण्याचा प्रयत्न केला होता,ख पण कालांतराने प्रकल्प बंद पडला तसेच तो दि.६ फेबूवारी २०१६ रोजी एक पंपसेट चालू करण्यात आला असून विहिरीत येणा-या अत्यल्प पाण्याअभावी पंप चालू करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

या प्रकल्पाच्या विहिरीमध्ये गाळ असल्याने ७०० mm ,९०० mm १२00 mm मुख्य मलवाहिणी लाईनमध्ये गाळ साचल्याने विहिरीमधे अत्यल्प प्रमाणात येत आहे तसेच या प्रकल्पाला शहरातील सांडपाण्याचे एकूण १९ नाले जोडण्यात आले असल्याने त्या नाल्यामधून वाहून आलेल प्लॉस्टीक वस्तू,कपडे गाळ कचरा ई. प्रकल्पातील विहिरीत तसेच मुख्य मलवाहिनीमध्ये पाणी येण्यास अडचण



निर्माण झाली आहे. त्यामूळे प्रकल्प बंद आहे. यापुर्वी सदरील प्रकल्पाच्या विहिरीतील गाळ काढण्यासाठी अनेकदा निविदा मागविण्यात आल्या होत्या परतु कत्राटदाराकडून निविदा खरेदी बाबत प्रतिसाद मिळाला नसल्याने गाळ काढणे तसेच राहिले आहे.

मनपा हध्दीतील SPS व STP हे प्रकल्प देखभाल व दुरुस्तीसाठी मे.प्रगती कन्स्ट्र.चाकूर यांना दि. १२ जानेवारी २०१५ पासून ( N.R.A.P शिवाय) देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आलेले आहेत. परंतू N.R.A.P प्रकल्प हा बंद अवस्थेत असल्याने त्यांच्याकडे हस्तांतरीत केला नव्हता तथापी तो दि. १.१०.२०१५ रोजी बंद अवस्थेत देखभालीसाठी त्यांच्याकडे देण्यात आला आहे.

सदरील प्रकल्प चालू करण्यासाठी विहिरीतील गाळ काढणे प्रकल्पातील उपलब्ध्द मशिनरी दुरुस्त करणे गोदावरी पात्रातील मुख्य मलवाहिनी वरील एकूण ५९ चेंबरची उंची १ ते १.५ मी.वाढविण्यो व चेंबरची दुरुस्ती करणे,काही चेबर नविन बांधकाम करणे,चंबरर्सवर नविन, फ्रेम कव्हर टाकणे,अंदाजे २.५ कि.मी.मुख्य मलवाहिनी मधील गाळ साफ करणे व प्रकल्पातील अस्तित्वात असलेली संपूर्ण ना दुरुस्त मशिनरी चालू करणे या कामासाठी अंदाजे १.२९ कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च गोदावरी शुध्दीकरण करणेसाठी व हे प्रकल्प चालू करण्यासाठी १४ व्या वित्त आयोगातून दुरुस्तीचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

करीता सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता देणेकरीता सालसन २०१५-२०१६ च्या १४ व्या वित्त आयोगाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खर्च करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१३**

नांदेड शहर पाणी पुरवठयासाठी पर्यायी उदभव योजना हि सांगवी कोल्हापुरी बंधारा येथे बांधुन पुर्ण झालेली आहे. सदर योजना शासनाकडुन दि.12.08.2014 या वर्षी मंजुर झालेली असुन योजनेची मुळ किंमत रु.1487.11 लक्ष इतकी असुन शासनाकडुन आतापर्यंत एकुण रु.1292.16 लक्ष इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. उर्वरित रक्कम रु.194.95 लक्ष मनपास खर्च करावयाचा आहे. योजना दि. 10.12.2015 या दिवशी कार्यान्वित करण्यात आलेली असुन येत्या मार्च महिण्यात पैनगंगा प्रकल्पातुन नांदेड शहरास पाणी सोडण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सांगवी येथील कोल्हापुर बंधा-याची क्षमता 0.54 दलघमी असुन बंधा-यात पाणी साठवण झाल्यास शहरासाठी फक्त 15 पाळ्या होतील. बंधा-याची पाणी साठवण क्षमता कमी असल्यामुळे पैनगंगा प्रकल्पातुन मिळणारे पाणी टंचाई काळात जास्त दिवस टिकुन राहण्यासाठी बंधा-याची दुरुस्ती तसेच बंधा-यातील वर्षानुवर्ष साचलेला गाळ काढणे अत्यंत आवश्यक आहे. आसना नदीवरील बंधारा हा दोन नद्यांच्या म्हणजेच आसना व मेंढला नाला याच्या संगमावर बांधलेला आहे. बंधा-यात पाणी हे मेंढला नाल्याद्वारे येते व ते पाणी आसना नदीच्या पात्रात साठवुन राहाते. आसना नदीचे पात्र पुर्णपणे गाळाने भरलेले असल्यामुळे त्यातील गाळ जवळपास पाच ते सहा

कि.मी.इतक्या अंतरा पर्यंत साचलेला आहे. सदरील गाळ काढल्यास सांगवी येथील नदीवरील बंधारा हा दुप्पट क्षमतेने भरणार आहे. म्हणजेच बंधा-याची क्षमता 1 दलघमी होणार आहे. याकरिता नदीतील गाळ काढण्यासाठी नदीच्या पात्राचे सर्व्हेक्षण करुन नदीतील गाळ काढण्याच्या कामासाठी लागणा-या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकीय किंमत रु. 279.00 लक्ष इतकी होत आहे.

नांदेड शहर पर्यायी पाणी पुरवठा योजनेची मंजुर किंमत रु. 1487.11 लक्ष इतकी आहे व गाळ काढण्यासाठी लागणारा खर्च रु. 279.00 लक्ष इतका आहे. कामाची मुळ किंमत व प्रत्यक्ष कामास आलेला/येणारा खर्च रु. 1803.53 लक्ष होणार आहे.

तसेच पर्यायी उदभव योजनेसाठी प्रत्यक्ष काम करतांना आलेला खर्च हा विद्युत पुरवठा कामासाठी रु. 50 लक्ष तरतुद होती परंतू प्रत्यक्ष जागेवर काम करतेवेळी Express feeder घेतल्यामुळे रु.37.42 लक्ष एवढा खर्च वाढला असुन प्रत्यक्ष कामाची किंमत रु.87.00 लक्ष इतकी झालेली आहे. आसना नदीतील गाळ काढणे रु.279.00 लक्ष व पर्यायी उदभव पाणी पुरवठा योजनेस झालेला खर्च रु.1487.11 असे एकुण रु. 1803.53 लक्ष इतक्या रक्कमेच्या खर्चास सुधारीत मान्यता देणे बाबत.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. तसेच पिंपळगांव येथील बंधा-याची उंची व रुंदी वाढविण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक असी दुरुस्तीसह मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ३८** **ठराव**

नांदेड शहर पाणी पुरवठयासाठी पर्यायी उदभव योजना हि सांगवी कोल्हापुरी बंधारा येथे बांधुन पुर्ण झालेली आहे. सदर योजना शासनाकडुन दि.12.08.2014 या वर्षी मंजुर झालेली असुन योजनेची मुळ किंमत रु.1487.11 लक्ष इतकी असुन शासनाकडुन आतापर्यंत एकुण रु.1292.16 लक्ष इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. उर्वरित रक्कम रु.194.95 लक्ष मनपास खर्च करावयाचा आहे. योजना दि. 10.12.2015 या दिवशी कार्यान्वित करण्यात आलेली असुन येत्या मार्च महिण्यात पैनगंगा प्रकल्पातुन नांदेड शहरास पाणी सोडण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सांगवी येथील कोल्हापुर बंधा-याची क्षमता 0.54 दलघमी असुन बंधा-यात पाणी साठवण झाल्यास शहरासाठी फक्त 15 पाळ्या होतील. बंधा-याची पाणी साठवण क्षमता कमी असल्यामुळे पैनगंगा प्रकल्पातुन मिळणारे पाणी टंचाई काळात जास्त दिवस टिकुन राहण्यासाठी बंधा-याची दुरुस्ती तसेच बंधा-यातील वर्षानुवर्ष साचलेला गाळ काढणे अत्यंत आवश्यक आहे. आसना नदीवरील बंधारा हा दोन नद्यांच्या म्हणजेच आसना व मेंढला नाला याच्या संगमावर बांधलेला आहे. बंधा-यात पाणी हे मेंढला नाल्याद्वारे येते व ते पाणी आसना नदीच्या पात्रात साठवुन राहाते. आसना नदीचे पात्र पुर्णपणे गाळाने भरलेले असल्यामुळे त्यातील गाळ जवळपास पाच ते सहा

कि.मी.इतक्या अंतरा पर्यंत साचलेला आहे. सदरील गाळ काढल्यास सांगवी येथील नदीवरील बंधारा हा दुप्पट क्षमतेने भरणार आहे. म्हणजेच बंधा-याची क्षमता 1 दलघमी होणार आहे. याकरिता नदीतील गाळ काढण्यासाठी नदीच्या पात्राचे सर्व्हेक्षण करुन नदीतील गाळ काढण्याच्या कामासाठी लागणा-या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकीय किंमत रु. 279.00 लक्ष इतकी होत आहे.

नांदेड शहर पर्यायी पाणी पुरवठा योजनेची मंजुर किंमत रु. 1487.11 लक्ष इतकी आहे व गाळ काढण्यासाठी लागणारा खर्च रु. 279.00 लक्ष इतका आहे. कामाची मुळ किंमत व प्रत्यक्ष कामास आलेला/येणारा खर्च रु. 1803.53 लक्ष होणार आहे.

तसेच पर्यायी उदभव योजनेसाठी प्रत्यक्ष काम करतांना आलेला खर्च हा विद्युत पुरवठा कामासाठी रु. 50 लक्ष तरतुद होती परंतू प्रत्यक्ष जागेवर काम करतेवेळी Express feeder घेतल्यामुळे रु.37.42 लक्ष एवढा खर्च वाढला असुन प्रत्यक्ष कामाची किंमत रु.87.00 लक्ष इतकी झालेली आहे. आसना नदीतील गाळ काढणे रु.279.00 लक्ष व पर्यायी उदभव पाणी पुरवठा योजनेस झालेला खर्च रु.1487.11 असे एकुण रु. 1803.53 लक्ष इतक्या रक्कमेच्या सुधारीत खर्चास आयुक्ताचे प्रस्तावानुसार मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते

मान्यता देते. तसेच पिंपळगांव येथील बंधा-याची उंची व रुंदी वाढविण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके कडून आसना नदीवरील बंधा-याच्या कडेला पर्यायी उदभव पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झालेली आहे. तसेच बंधा-याची दुरुस्ती व नविन गेट बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. जलसंपदा विभागाकडील माहिति नूसार बंधा-



याची क्षमता 0.54 दलघमी इतकी आहे. परंतू बंधा-यात वर्षानूवर्ष गाळ साचलेला असल्यामुळे बंधारा त्याच्या पूर्ण क्षमतेने भरत नाही. त्यामुळे टंचाई काळात शहराच्या पाणी पुरवठा कामासाठी मिळणारे पाणी अत्यल्प साठयामुळे शहरासाठी कमी पडणार आहे. त्यासाठी बंधा-याची दुरुस्ती व नविन गेट बसविणे तसेच बंधा-याची क्षमता वाढविण्यासाठी बंधा-याच्या साठवण क्षेत्रातील गाळ काढण्यासाठी सविस्तर सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्या सर्वेक्षणानूसार बंधा-यात एकुण 140930 घ.मी. गाळ साचला आहे. सदरील गाळ काढल्यानंतर बंधा-याची क्षमता 1 दलघमी इतकी होणार आहे. सदरील गाळ काढण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकात नदीपात्रातील गाळ काढून नदीच्या किना-यावर Banking करणे व नदीचे खोलीकरण करणे इ. बाबी समाविष्ट आहेत. सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु. 279.15 लक्ष इतकी होत असून सदर खर्च हा महानगरपालिकेस करणे आर्थिक अडचण निर्माण होणारे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सध्या संपूर्ण महाराष्ट्रातील नदी, नाले व ओढयातील गाळ काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्या अंतर्गत सदरील खर्च महाराष्ट्र राज्य शासनाकडून प्राप्त झाल्यास कंत्राटदाराचे देयक अदाई करणे शक्य होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गत महाराष्ट्र शासना कडून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्यास प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ३९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके कडून आसना नदीवरील बंधा-याच्या कडेला पर्यायी उदभव पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झालेली आहे. तसेच बंधा-याची दुरुस्ती व नविन गेट बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. जलसंपदा विभागाकडील माहिति नूसार बंधा-याची क्षमता 0.54 दलघमी इतकी आहे. परंतू बंधा-यात वर्षानूवर्ष गाळ साचलेला असल्यामुळे बंधारा त्याच्या पूर्ण क्षमतेने भरत नाही. त्यामुळे टंचाई काळात शहराच्या पाणी पुरवठा कामासाठी मिळणारे पाणी अत्यल्प साठयामुळे शहरासाठी कमी पडणार आहे. त्यासाठी बंधा-याची दुरुस्ती व नविन गेट बसविणे तसेच बंधा-याची क्षमता वाढविण्यासाठी बंधा-याच्या साठवण क्षेत्रातील गाळ काढण्यासाठी सविस्तर सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्या सर्वेक्षणानूसार बंधा-यात एकुण 140930 घ.मी. गाळ साचला आहे. सदरील गाळ काढल्यानंतर बंधा-याची क्षमता 1 दलघमी इतकी होणार आहे. सदरील गाळ काढण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकात नदीपात्रातील गाळ काढून नदीच्या किना-यावर Banking करणे व नदीचे खोलीकरण करणे इ. बाबी समाविष्ट आहेत. सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु. 279.15 लक्ष इतकी होत असून सदर खर्च हा महानगरपालिकेस करणे आर्थिक अडचण निर्माण होणारे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सध्या संपूर्ण महाराष्ट्रातील नदी, नाले व ओढयातील गाळ काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्या अंतर्गत सदरील खर्च महाराष्ट्र राज्य शासनाकडून प्राप्त झाल्यास कंत्राटदाराचे देयक अदाई करणे शक्य होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी, नांदेड याच्या मार्फत महाराष्ट्र शासना कडून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्वसाधारण सभेत दिनांक 04/07/2012 रोजी संमत केलेला ठराव क्र.58 अन्वये अल मॅफको फ्रुजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांचा प्रस्ताव मान्य करून त्यांना कार्यालयीन पत्र जा.क्र.जवमा/794/13, दिनांक 20/03/2013 अन्वये ईतवारा भागात पुर्वीच्या मॅफकोच्या जागी त्यांच्या नावाने असल्यामुळे त्याच ठिकाणी तीन महिन्यात कत्तलखाना चालू करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली होती. तसेच त्या आदेशामध्ये अट क्र.18 मध्ये स्पष्ट नमुद आहे की, वरील अटीतील कागदपत्रांच्या पुर्तता केल्यानंतरच सदरील परवानगी ग्राहय धरण्यात येईल. या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये प्रकल्प सुरु न करता त्यांचे पत्र दिनांक 11/06/2013 अन्वये परत तीन महिन्याची मुदत देण्याची विनंती केली होती. तथापी, सदरील प्रकल्प सुरु न करता त्यांनी पुनःश्च दिनांक 03/10/2013 रोजी अर्ज देऊन परत एक महिन्याची मुदत देण्याची विनंती केली व तद्नंतर कत्तलखान्याचे काम पूर्ण झाल्याचे पत्र दिले आहे.

परंतु शहरातील मध्यवर्ती भागात कत्तलखाना होत असल्यामुळे त्या विरोधात शहरातील नागरीकांनी व काही संघटनांनी (पशुहत्या विरोधी नागरी समिती, महाराष्ट्र) विरोध करून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सदरील प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले. त्यानुसार महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र नांदेड, उप-आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड आणि उपविभागीय अधिकारी, नांदेड यांची त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. सदरील प्रकरण शहरात गाजत असल्यामुळे दिनांक 28.11.2013 च्या सर्वसाधारण सभेत त्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार महासभेने त्रिसदस्यीय समितीचा अहवाल सर्वसाधारण सभे समोर चर्चेसाठी ठेवण्यात यावे तो पर्यत मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स

प्रा.लि. नांदेड च्या कंत्राटदारास काम थांबवण्याचे व पुढील मुदतवाढ सर्व साधारण सभेच्या मान्यते शिवाय देण्यात येवु नये अशा ठराव क्र.144 पारीत झाला आहे.

त्रिसदस्यीय समितीने दिनांक 02/02/2014 रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्यांचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

निष्कर्ष

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 331 मध्ये शहरात किंवा शहराच्या कोणत्याही विनिर्दिष्ट भागात नवीन खाजगी बाजार आणि कत्तलखाने उघडणे बाबत तरतूद आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेडला आधुनिक पध्दतीने कत्तलखाना उभारण्याकरिता ठराव क्र.58, दिनांक 04/07/2012 अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी दिनांक 20/03/2013 रोजी नाहरकत पत्र दिले आहे. परंतू मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांनी सदर अहवालात उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे जमीन हस्तांतरणा विषयक व मुद्रांक शुल्क भरणा विषयक अनियमितता केल्या आहेत. सदर अनियमितता विचारात घेता मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांना सद्यास्थितीत कत्तलखान्याची परवानगी देणे योग्य होणार नाही. सदर अनियमितते बाबत महानगरपालिकने रितसर कायदेशीर कार्यवाही करुनच परवानगी देणे बाबतचा निर्णय घेणे योग्य राहील.

सदरील निष्कर्ष क्र.1 नुसार संबधितानी दिनांक 27.08.2015 च्या अर्जासोबत सह जिल्हा निबंधक वर्ग-1, नांदेड यांच्या दिनांक 09.02.2012 च्या पत्रानुसार बाजार मुल्यावर कमी पडलेल्या मुद्रांक शुल्काची वसुली पुर्ण झाली आहे. असे पत्र अर्जासोबत दिले आहे. त्यामुळे सदरील निष्कर्षाची पुर्तता झाली आहे.

2) मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र, कत्तलखाना उभारणी संदर्भात परवानगी तसेच नाहरकत पत्रात नमुद उर्वरीत परवानग्या अद्यापपर्यंत घेतलेल्या नाहीत. त्यामुळे सद्यास्थितीत त्यांना कत्तलखान्याची परवानगी देणे योग्य होणार नाही.

सदरील निष्कर्ष क्र.2 च्या नुसार संबधितानी



अ) दिनांक 27.8.2015 च्या अर्जासोबत महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळाचे दिनांक 13.2.2015 चे नाहरकत प्रमाणपत्र दाखल केले आहे.

ब) अल-मॅफ़्को फ़्रोज़न फुड्स प्रा.लि.नांदेड यांनी एपीडा (Agriculture and processed food products export development authority) यांचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.

क) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, मनपा यांनी दिनांक 22/03/2013 ते 31/03/2014 पर्यत देण्यात आलेले व्यवसाय परवान्याची मुदत संपल्यामुळे विहीत मुदतीत त्यांच्या विनंती अर्जानुसार सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रमांक-'क' यांना प्राप्त अधिकारानुसार दिनांक 01/4/2014 ते 31/03/2015, दिनांक 01/04/2015 ते 31/03/2016 पर्यत केवळ शेळी, बकरी, म्हैस व व्हेजिटेबल फुडस् चा व्यवसाय परवान्याचे नुतनीकरण करुन देण्यात आले.

ड) जिल्हा पशु संवर्धन उप-आयुक्त, नांदेड यांनी मे.अल मॅफ़्को फ़्रोज़न फुड्स प्रा.लि. या कत्तलखान्यासाठी पशु वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी पशुधन विकास अधिकारी, पशुवधगृह, नांदेड यांना दिनांक 8.7.2015 च्या पत्रान्वये आदेशीत केले आहे.

3) मे.अल मॅफ़्को फ़्रोज़न फुड्स प्रा.लि. नांदेड यांच्या कत्तलखान्याच्या उभारणी संदर्भात महानगरपालिकेकडे नागरीकांच्या व लोक प्रतिनिधींच्या वेळोवेळी प्रापत झालेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यात आलेली नाही. त्यांचे रितसर निराकरण करुनच महानरगपालिकेने पुढील निर्णय घेणे योग्य राहील.

निष्कर्ष क्र.3 साठी मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांना मनपा प्रशासनाने दिनांक 14/09/2015 रोजी पत्र पाठवून निष्कर्श क्र.3 अन्वये नागरीकांचे व लोकप्रतिनिधिच्या आक्षेपांचे निराकरण निष्पक्ष पध्दतीने होण्यासाठी आपल्या कार्यालयामार्फत नागरीकांचे तक्रारी आक्षेप यांची सुनावणी घेण्यासाठी जाहीर प्रगटन प्रसिध्द करुन त्यानंतर सुनावणी प्रक्रीया त्यांच्या कार्यालयाकडून होण्यासाठी आदेशित करणे योग्य राहील. अशी मनपा कार्यालयाची धारणा असल्याबाबत कळवून विनंती केली होती.

त्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र जा.क्र./नपाप्र/टे-6/2015, दिनांक 11/12/2015 अन्वये मनपा अधिनियम 1949 मधील कलम 331 अन्वये मे.अल मॅफको फ्रुजन फुड्स प्रा.लि.नांदेड यांनी कत्तलखाना संदर्भात प्राप्त आक्षेपाचे निराकारण करणे व त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत असे कळवून त्यावर उचित कार्यवाही करण्यास कळविले आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाने दिनांक 04 मार्च 2015 च्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागु केलेला आहे. त्याअनुषंगाने मे.अल मॅफको फ्रुजन फुड्स प्रा.लि.नांदेड यांना मनपा क्षेत्रात गोवंश, ( गाय, बैल व वळू ) या जनावरा व्यतिरिक्त इतर जनावरांच्या कत्तलीसाठी कत्तलखाना सुरु करण्यासाठी वरील प्रमाणे कार्यवाही सुरु करुन देणे बाबत निर्णयास्तव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येते.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास शिवसेना नगरसेवकांचा विरोध नोंदवुन बहुमताने प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

**ठराव क्रं. ४०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्वसाधारण सभेत दिनांक 04/07/2012 रोजी संमत केलेला ठराव क्र.58 अन्वये अल मॅफको फ्रुजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांचा प्रस्ताव मान्य करुन त्यांना कार्यालयीन पत्र जा.क्र.जवमा/794/13, दिनांक 20/03/2013

अन्वये ईतवारा भागात पुर्वीच्या मॅफकोच्या जागी त्यांच्या नावाने असल्यामुळे त्याच ठिकाणी तीन महिन्यात कत्तलखाना चालू करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली होती. तसेच त्या आदेशामध्ये अट क्र.18 मध्ये स्पष्ट नमुद आहे की, वरील अटीतील कागदपत्रांच्या पुर्तता केल्यानंतरच सदरील परवानगी ग्राहय धरण्यात येईल. या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये प्रकल्प सुरु न करता त्यांचे पत्र दिनांक 11/06/2013 अन्वये परत तीन महिन्याची मुदत देण्याची विनंती केली होती. तथापी, सदरील प्रकल्प सुरु न करता त्यांनी पुनःश्च दिनांक 03/10/2013 रोजी अर्ज देऊन परत एक महिन्याची मुदत देण्याची विनंती केली व तद्रंतर कत्तलखान्याचे काम पूर्ण झाल्याचे पत्र दिले आहे.

परंतु शहरातील मध्यवर्ती भागात कत्तलखाना होत असल्यामुळे त्या विरोधात शहरातील नागरीकांनी व काही संघटनांनी (पशुहत्या विरोधी नागरी समिती, महाराष्ट्र) विरोध करुन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सदरील प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले. त्यानुसार महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र नांदेड, उप-आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड आणि उपविभागीय अधिकारी, नांदेड यांची त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. सदरील प्रकरण शहरात गाजत असल्यामुळे दिनांक 28.11.2013 च्या सर्वसाधारण सभेत त्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार महासभेने त्रिसदस्यीय समितीचा अहवाल सर्वसाधारण सभे समोर चर्चेसाठी ठेवण्यात यावे तो पर्यत मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड च्या कंत्राटदारास काम थांबवण्याचे व पुढील मुदतवाढ सर्व साधारण सभेच्या मान्यते शिवाय देण्यात येवु नये अशा ठराव क्र.144 पारीत झाला आहे.

त्रिसदस्यीय समितीने दिनांक 02/02/2014 रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्यांचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

निष्कर्ष 1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 331 मध्ये शहरात किंवा शहराच्या कोणत्याही विनिर्दिष्ट भागात नवीन खाजगी बाजार आणि कत्तलखाने उघडणे बाबत तरतूद आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेडला आधुनिक पध्दतीने कत्तलखाना उभारण्याकरिता ठराव क्र.58, दिनांक 04/07/2012 अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी दिनांक 20/03/2013 रोजी नाहरकत पत्र दिले आहे. परंतू मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांनी सदर अहवालात उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे जमीन हस्तांतरणा विषयक व मुद्रांक शुल्क भरणा विषयक अनियमितता केल्या आहेत. सदर अनियमितता विचारात घेता मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांना सद्यास्थितीत कत्तलखान्याची परवानगी देणे योग्य होणार नाही. सदर अनियमितते बाबत महानगरपालिकने रितसर कायदेशीर कार्यवाही करुनच परवानगी देणे बाबतचा निर्णय घेणे योग्य राहील.

सदरील निष्कर्ष क्र.1 नुसार संबधितानी दिनांक 27.08.2015 च्या अर्जासोबत सह जिल्हा निबंधक वर्ग-1, नांदेड यांच्या दिनांक 09.02.2012 च्या पत्रानुसार बाजार मुल्यावर कमी पडलेल्या मुद्रांक शुल्काची वसुली पुर्ण झाली आहे. असे पत्र अर्जासोबत दिले आहे. त्यामुळे सदरील निष्कर्षाची पुर्तता झाली आहे.

2) मे.अल मॅफको फ्रोजन फुड्स प्रा.लि. नांदेड यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र, कत्तलखाना उभारणी संदर्भात परवानगी तसेच नाहरकत पत्रात नमुद उर्वरीत परवानग्या अद्यापपर्यंत घेतलेल्या नाहीत. त्यामुळे सद्यास्थितीत त्यांना कत्तलखान्याची परवानगी देणे योग्य होणार नाही.

सदरील निष्कर्ष क्र.2 च्या नुसार संबधितानी

अ) दिनांक 27.8.2015 च्या अर्जासोबत महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळाचे दिनांक 13.2.2015 चे नाहरकत प्रमाणपत्र दाखल केले आहे.

ब) अल-मॅफ्को फ्रोज़न फुड्स प्रा.लि.नांदेड यांनी एपीडा (Agriculture and processed food products export development authority) यांचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.



क) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, मनपा यांनी दिनांक 22/03/2013 ते 31/03/2014 पर्यत देण्यात आलेले व्यवसाय परवान्याची मुदत संपल्यामुळे विहीत मुदतीत त्यांच्या विनंती अर्जानुसार सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रमांक-'क' यांना प्राप्त अधिकारानुसार दिनांक 01/4/2014 ते 31/03/2015, दिनांक 01/04/2015 ते 31/03/2016 पर्यत केवळ शेळी, बकरी, म्हैस व व्हेजिटेबल फुडस् चा व्यवसाय परवान्याचे नुतनीकरण करुन देण्यात आले.

ड) जिल्हा पशु संवर्धन उप-आयुक्त, नांदेड यांनी मे.अल मॅफ्को फ्रोज़न फुड्स प्रा.लि. या कत्तलखान्यासाठी पशु वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी पशुधन विकास अधिकारी, पशुवधगृह, नांदेड यांना दिनांक 8.7.2015 च्या पत्रान्वये आदेशीत केले आहे.

3) मे.अल मॅफ्को फ्रोज़न फुड्स प्रा.लि. नांदेड यांच्या कत्तलखान्याच्या उभारणी संदर्भात महानगरपालिकेकडे नागरीकांच्या व लोक प्रतिनिधींच्या वेळोवेळी प्रापत झालेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यात आलेली नाही. त्यांचे रितसर निराकरण करुनच महानरगपालिकेने पुढील निर्णय घेणे योग्य राहील.

निष्कर्ष क्र.3 साठी मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांना मनपा प्रशासनाने दिनांक 14/09/2015 रोजी पत्र पाठवून निष्कर्श क्र.3 अन्वये नागरीकांचे व लोकप्रतिनिधिच्या आक्षेपांचे निराकरण निष्पक्ष पध्दतीने होण्यासाठी आपल्या कार्यालयामार्फत नागरीकांचे तक्रारी आक्षेप यांची सुनावणी घेण्यासाठी जाहीर प्रगटन प्रसिध्द करुन त्यानंतर सुनावणी प्रक्रीया त्यांच्या कार्यालयाकडून होण्यासाठी आदेशित करणे योग्य राहील. अशी मनपा कार्यालयाची धारणा असल्याबाबत कळवून विनंती केली होती.

त्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र जा.क्र./नपाप्र/टे-6/2015, दिनांक 11/12/2015 अन्वये मनपा अधिनियम 1949 मधील कलम 331 अन्वये मे.अल मॅफको फ्रुजन फुड्स प्रा.लि.नांदेड यांनी कत्तलखाना संदर्भात प्राप्त आक्षेपाचे निराकारण करणे व त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत असे कळवून त्यावर उचित कार्यवाही करण्यास कळविले आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाने दिनांक 04 मार्च 2015 च्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागु केलेला असुन त्यानुसार गोवंश हत्याबंदीवर अमलबजावणी करणे आवश्यक आहे. प्रशासना मार्फत वरील सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहुन शपथपत्र / करारनामा इत्यादी बाबींची पुर्तता करुन मे. अल मॅफको फ्रुजन फुड्स प्रा. लि. नांदेड यांना मनपा क्षेत्रात गोवंश, ( गाय, बैल व वळू ) या जनावरा व्यतिरिक्त इतर जनावरांच्या कत्तलीसाठी कत्तलखाना सुरु करण्यासाठी हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व शिवसेना नगरसेवकांचा विरोध नोंदविण्यात येतो.

**विषय क्र.१६** **प्रस्ताव**

नांवामनपा हद्यीतील प्रभाग क्र.३९ इंदीरा गांधी शाळेच्या बाजूस असलेल्या पंचशिल विहार समोरील चौक हा अत्यंत अरुंद असल्यामूळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. आणि त्या ठिकाणी केंद्रीय व माध्यमिक शाळा असल्यामूळे वारंवार अपघात होत आहे. त्यामूळे या चौकाचे विस्तारीकरणे आवश्यक झालेले आहे. या चौकाचे बाजूस महानगरपालिकेची मोकळी जागा असल्यामूळे चौकाचे विस्तारीकरणासाठी खर्च लागणार नाही तरी या चौकाचे विस्तारीकरण करण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचक**:- डॉ.सौ.ललिता बोकारे (शिंदे ) **अनुमोदक**:- डॉ.करुणा जमदाडे

**प्रशासकिय टिप्पणी**

प्रभाग क्रं. ३९ इंदिरा गांधी शाळेच्या बाजुस पंचशिल विहार आहे. त्या ठिकाणी असलेल्या मोकळया जागेत सिडको विभागाने केलेल्या Septictank आहे. सदरील रस्ता हा हडको सिडकोकडे जाणारा मुख्य रस्ता आहे. सदरील मोकळी जागा सिडकोन महानगरपालिकेस हस्तांतरीत केली असल्यास नियमानुसार चौकाचे विस्तारीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**महापौर** स. सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ४१** **ठराव**

नांवामनपा हद्यीतील प्रभाग क्र.३९ इंदीरा गांधी शाळेच्या बाजूस असलेल्या पंचशिल विहार समोरील चौक हा अत्यंत अरुंद असल्यामूळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. आणि त्या ठिकाणी केंद्रीय व माध्यमिक शाळा असल्यामूळे वारंवार अपघात होत आहे. त्यामूळे या चौकाचे विस्तारीकरणे आवश्यक झालेले आहे. या चौकाचे बाजूस महानगरपालिकेची मोकळी जागा असल्यामूळे चौकाचे विस्तारीकरणासाठी खर्च लागणार नाही तरी या चौकाचे विस्तारीकरण करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.१७** **प्रस्ताव**

नांवामनपा हद्यीतील प्रभाग क्र.३९ मधील वात्सल्यनगर हौ.सोसायटीत महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या अभ्यासिका व वाचनालयास तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री मराठवाडयाचे शिल्पकार डॉ.शंकरराव चव्हाण यांचे नांव देणे बाबत.

**सुचक**:- विनय विश्वांभरराव पाटील **अनुमोदक**:- सौ.वैजयंती गायकवाड

**महापौर** स. सदस्यांच्या प्रस्तावास कोणाचे नाही देण्यात आलेले नसल्यास या अटीवर मान्यता देण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ४२** **ठराव**

नांवामनपा हद्यीतील प्रभाग क्र. ३९ मधील वात्सल्यनगर हौ. सोसायटीत महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या अभ्यासिका व वाचनालयास तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री मराठवाडयाचे शिल्पकार डॉ.शंकरराव चव्हाण यांचे नांव देण्यापुर्वी कोणतेही नाही देण्यात आलेले नसल्यास या अटीवर देण्यास सदरचे नांव देण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते बाबत.

**विषय क्र.१८** **प्रस्ताव**

श्री गुरु गोविंदसिंघजी शासकीय रुग्णालय (२०० खाटांचे बाहय रुग्णालय) तसेच महाविद्यालयाचे स्थलांतर विष्णुपुरी येथील नविन इमारतीत स्थलांतरीत झाले आहे. त्यामूळे सदर रुग्णालयाची जूनी इमारत रिकामी आहे. भविष्यात सदर इमारतीची आवश्यकता महानगरपालिकेस पडेल तसेच महानगरपालिकेस इतरत्र असलेले विभाग सदर इमारतीत स्थलांतरीत केल्यास महानगरपालिकस सोईचे होईल. त्याकरीता सदर इमारत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठी शासनास प्रस्ताव पाठविण्याकरीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- आनंद चव्हाण **अनुमोदक**:- शफी अहेमद कुरेशी

**आनंद चव्हाण** सदरचा विषय दिनांक २९.०२.२०१६ रोजी झालेल्या सभेत मी मागे घेत जाहीर करुन सदरचा विषय पत्रिकेतुन वगळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**महापौर** सुचक श्री आनंद चव्हाण यांनी आपला विषय मागे घेतल्याचे जाहीर केल्यामुळे सदरचा विषय पत्रिकेवरुन वगळण्यात येतो.



**विषय क्र.१९** **प्रस्ताव**

मनपा हध्दीतील खयुम प्लॉट मदिनानगर भागातील पशुवैद्यकिय दवाखान्याच्या संरक्षण भिंतीचे काम चालू आहे. सदर भिंत रस्त्यालगत असल्यामूळे सदर भिंत रस्त्यावर बांधल्यास नागरीकांना ये जा करण्यास अडचणीचे ठरेल त्यामूळे सदर रस्ता १० मि.रुंद करणे आवश्यक आहे.

करीता सदर दवाखान्यालगत असलेला रस्ता १० मी.रुंद करणेकरीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- इशरत फातेमा, अ.लतिफ अ.मजीद **अनुमोदक**:- शफी अहेमद कुरेशी,चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस

**महापौर** सदरचा विषय दिनांक ११.०५.२०१६ च्या सभेत आलेला असुन त्यावर निर्णय घेण्यात आलेला आहे त्यामुळे सदरचा विषय विषय पत्रिकेवरुन वगळण्यात येतो.

**विषय क्र.२०** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.३८ सिडको येथे जेष्ठ नागरीकासाठी नांदेड शहरात असलेल्या नाना नानी पार्कच्या धर्तीवर सिडको हडको परिसरात विरंगूळा केंद्र उभारणीसाठी आम्ही ठराव दाखल करीत आहे. करीता प्रभाग क्र. ३८ मध्ये महानगरपालिकेच्या जागेत मोडकळीस आलेले सभागृह आहे .सदर सभागृहाची दुंरुस्ती करुन सभागृहाच्या परिसरात जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणे बाबत.

**सुचक** :- संदीप सुभाषराव चिखलीकर **अनुमोदक**:- सौ.मंगलाताई देशमूख

**प्रशासकिय टिप्पणी**

प्रभाग क्रं. ३८ मध्ये सिडको या ठिकाणी सभागृह बांधकाम झालेले आहे. सदरील सभागृह ब-याच वर्षापुर्वी खासदार निधी अंतर्गत झाले असल्यामुळे सदरील इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे निधी उपलब्धतेनुसार सदरील काम हाती घेण्यात येईल.

**महापौर** स. सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ४३** **ठराव**

प्रभाग क्र. ३८ सिडको येथे जेष्ठ नागरीकासाठी नांदेड शहरात असलेल्या नाना नानी पार्कच्या धर्तीवर सिडको हडको परिसरात विरंगूळा केंद्र उभारणीसाठी आम्ही ठराव दाखल करीत आहे. करीता प्रभाग क्र. ३८ मध्ये महानगरपालिकेच्या जागेत मोडकळीस आलेले सभागृह आहे सदर सभागृहाची दुंरुस्ती करुन सभागृहाच्या परिसरात जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.२१** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र. ३८ मध्ये सिडको एन.डि.४१ या भागातील मोकळया जागेवर मागील १५ वर्षापुर्वी तत्कालिन खासदार निधीतून जेष्ठ नागरीकासाठी एक छोटया स्वरुपाचे विरंगुळा केंद्र बांधण्यात आले होते .आजमितीस त्या विरंगुळा केंद्राची अवस्था अत्यंत खराब झालेली आहे. या ठिकाणी मागील १५ ते २० वर्षापासून सिडको हडको भागातील जेष्ठ नागरीक हे एकत्र जमतात या ठिकाणी सर्व जेष्ठ नागरीकांची बैठक भरते वृत्तपत्रे ई.वाचन करणेसाठी त्यांचेमध्ये चर्चा विचार विनिमय करण्याचे हे ठिकाण मागील १५ ते २० वर्षापासुन अस्तिवात आहे परंतु सध्यस्थितीत या विरंगुळा केंद्राची अवस्था अत्यंत खराब झालेली असून या ठिकाणी काही नागरीक मद्यपान करुन जेष्ठ नागरीकांना शिवीगाळ करीत आहेत ज्यांचा नाहक त्रास या भागातील सर्व नागरीकांना होत आहे त्यामूळे मागील १५ वर्षापासुन अस्तीत्वात असलेल्या विरंगुळा केंद्राची महानगरपालिकेतर्फे दुरुस्ती करुन तेथे एक संरक्षक भिंत बांधण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यत देते.

**सुचक** :- संजय गंगाधर मोरे **अनुमोदक**:- सौ.मंगलाताई गजानन देशमूख

**प्रशासकिय टिप्पणी**

प्रभाग क्रं. ३८ मध्ये सिडको या ठिकाणी सभागृह बांधकाम झालेले आहे सदरील सभागृह ब-याच वर्षापुर्वी खासदार निधी अंतर्गत णाले असल्यामुळे सदरील इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे निधी उपलब्धतेनुसार सदरील काम हाती घेण्यात येईल.

**महापौर** स. सदस्यांचया प्रस्तावास मानयता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ४४** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र. ३८ मध्ये सिडको एन.डि.४१ या भागातील मोकळया जागेवर मागील १५ वर्षापुर्वी तत्कालिन खासदार निधीतून जेष्ठ नागरीकासाठी एक छोटया स्वरुपाचे विरंगुळा केंद्र बांधण्यात आले होते .आजमितीस त्या विरंगुळा केंद्राची अवस्था अत्यंत खराब झालेली आहे. या ठिकाणी मागील १५ ते २० वर्षापासून सिडको हडको भागातील जेष्ठ नागरीक हे एकत्र जमतात या ठिकाणी सर्व जेष्ठ नागरीकांची बैठक भरते वृत्तपत्रे ई.वाचन करणेसाठी त्यांचेमध्ये चर्चा विचार विनिमय करण्याचे हे ठिकाण मागील १५ ते २० वर्षापासुन अस्तिवात आहे परंतु सध्यस्थितीत या विरंगुळा केंद्राची अवस्था अत्यंत खराब झालेली असून या ठिकाणी काही

नागरीक मद्यपान करुन जेष्ठ नागरीकांना शिवीगाळ करीत आहेत ज्यांचा नाहक त्रास या भागातील सर्व नागरीकांना होत आहे त्यामूळे मागील १५ वर्षापासुन अस्तीत्वात असलेल्या विरंगुळा केंद्राची महानगरपालिकेतर्फे दुरुस्ती करुन तेथे एक संरक्षक भिंत बांधण्यास ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यत देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.२२** **प्रस्ताव**

सिडको लातूर फाटा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरचौक असून मागील २७ वर्षापासुन हा चौक व परिसर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक म्हणून संबंध मराठवाडाभर लोकांना माहित आहे.आज पर्यत महानगरपालिकेकडून कसल्याही प्रकारचे सुशोभिकरण करण्यात आलेले नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करण्यासाठी लागणा-या अंदाजे १ कोटी ची मी सर्वसाधारण सभेसमोर वारंवार मागणी केलेली आहे. तसेच यासंबंधी दि.२८ जून २०१३ रोजी तत्कालिन आयुक्त मा.श्री जी श्रीकांत व तत्कालिन महापौर मा.श्री अ.सत्तार साहेब यांना निवेदन देवून कार्यवाही करण्याची विनंती केली होती व तदनंतर ही याबाबतीत निवेदन दिलेले आहेत परतु आज पर्यत चोकाच्या सुशोभिकरणाची काहीच कार्यवाही झालेली नाही.

या वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी शतकोत्तर जयती महोत्सव देशभर शासकीय व सामाजिक स्तरावर साजरी होणर आहे म्हणून याच सर्वसाधारण सभेत डॉ,.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा विचार करुन लातूर फाटा सिडको स्थीत चौकाचे सुशोभिकरण करुन देण्यासाठी ही सर्वसाधारण सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात देते.

**सुचक :-** डॉ.करुणा भिमराव जमदाडे **अनुमोदक**:- रजिया बेगम अयुब खॉं

**(१२)**

**प्रशासकिय टिप्पणी**

सिडको लातुर फाटा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असून सदर चौक हा राष्ट्रीय महामार्ग (NH) या रस्त्यामध्ये आहे. सदर रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेला नाही. तसेच शासन निर्णय व मा. सर्वोच्च न्यायालय यांचे निर्णय तपासुन नियमानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करण्यात येईल.

**महापौर** स. सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. ४५** **ठराव**

सिडको लातूर फाटा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरचौक असून मागील २७ वर्षापासुन हा चौक व परिसर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक म्हणून संबंध मराठवाडाभर लोकांना माहित आहे.आज पर्यत महानगरपालिकेकडून कसल्याही प्रकारचे सुशोभिकरण करण्यात आलेले नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करण्यासाठी लागणा-या अंदाजे १ कोटी ची मी सर्वसाधारण सभेसमोर वारंवार मागणी केलेली आहे. तसेच यासंबंधी दि.२८ जून २०१३ रोजी तत्कालिन आयुक्त मा.श्री जी श्रीकांत व तत्कालिन महापौर मा.श्री अ.सत्तार साहेब यांना निवेदन देवून कार्यवाही करण्याची विनंती केली होती व तदनंतर ही याबाबतीत निवेदन दिलेले आहेत परतु आज पर्यत चोकाच्या सुशोभिकरणाची काहीच कार्यवाही झालेली नाही.

या वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी शतकोत्तर जयती महोत्सव देशभर शासकीय व सामाजिक स्तरावर साजरी होणार आहे म्हणून याच सर्वसाधारण सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा विचार करुन लातूर फाटा सिडको स्थीत चौकाचे सुशोभिकरण करण्यास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२३**

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील रस्त्यांना चौंकांना नाव देण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीच्या सभेचे कार्यवृत्त</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.४५ दि.२४.५.२०१२ अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या रस्त्यांना चौकांना इमारतींना नांव देण्यासाठी आलेल्या प्रस्तावाची छाननी करुन नांव देण्यासासाठी शिफारस करण्याकरीता महापौरांच्या अध्यक्षतेखाली उपमहापौर, सभापती, स्थायी समिती, सभागृह नेते व विरोधी पक्ष नेते या पदसिंध्द पदाधिका-यांची उपसमिती गठित केलेली आहे, त्यानूसार स.सदस्यांनी सादर केलेल्या नामकरणाच्या प्रस्तावाची छाननी करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यासाठी उपसमिती सभा दि.१६.२.२०१६ रोजी दुपारी ३.०० वा.सौ.शैलजा किशोर स्वामी, महापौर, नांवामनपा नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कक्षात घेण्यात आली या उपसमितीच्या बैठकीस उपसमितीचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री शफि अहेमद कुरेशी, उपमहापौर

२) सौ.अनुजा अमितसिंह तेहरा,सभापती,स्थायी समिती

३) श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेता

४) श्री बालाजी कल्याणकर,विरोधी पक्ष नेता

महानगरपालिका हध्दीतील रस्त्यांना चौकांना व इमारतीना नाव देण्यासाठी स. सदस्यांनी सादर केलेले प्रस्ताव उपसमिती समोर मांडण्यात आले असता उपसमितीस खालील बाबी निदर्शनास आल्या.

स.सदस्य नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील रस्त्यांना चौकांना नांव देण्यासाठी नगरसचिव कार्यालयात प्रस्ताव सादर करतात परंतु प्रस्तावात ज्या रस्त्यांना चौकांना ज्यांचे नाव द्यावयाचे आहेत त्या व्यक्तींचा प्रस्तावात अल्प परिचय, त्याचे विविध क्षेत्रात केलेले कार्य, सामाजिक-राजकिय कार्य, शैक्षणिक कार्य, देशासाठी शहरासाठी राहिलेले योगदान ई. कार्याचा उल्लेख करण्यात येत नाही. त्यामूळे सभागृहात स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे स्पष्टीकरण देता येत नाही. तसेच स.सदस्य प्रभागातील मुख्य रस्त्याचे नांवे प्रस्तावित न करता प्रभागातील सर्वच अंतर्गत गल्लीतील छोटया अरुंद व कमी लांबींच्या रस्त्यांना नावे देण्याचे प्रस्तावित करीत आहेत. अशा अरुंद रस्त्यावर लावण्यात आलेल्या नामफलकामूळे वाहतुकीस अडथळा येत असून ज्या ठिकाणी नावाचा नामफलक लावावयाचा आहे त्या ठिकाणी असलेले मालमत्ताधारक व दुकानदार घरासमोर दुकानासमोर नामफलक लावण्यास विरोध करीत आहे तर काही ठिकाणी यापुर्वी लावण्यात आलेल्या नामफलकाचा जाहिरात फलक, पॉम्प्लेट चिटकविण्याकरीता वापर होत आहे.

तसेच स.सदस्य लोकवस्तीला वसाहतीला नांव देण्याचे प्रस्ताव देत आहे. नियमानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या रस्त्यांना, चौकांना व इमारतीना नांव देण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत परंतु वसाहतीला किंवा लोकवस्तीला काय नाव द्यावयाचे हे ठरविण्याचे अधिकार त्या भागातील नागरीकांना आहे त्यामूळे लोकवस्तीला नाव देता येत नाही.

त्यामूळे उपसमितीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील रस्त्यांना, चौंकांना, इमारतींना नाव देण्यासाठी सर्वसाधारण सभेने मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन द्यावी जेणे करुन उपसमितीस आलेल्या प्रस्तावाची छाननी करुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेस सादर करता येतील अशी शिफारस केलेली आहे त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**महापौर** मनपा हद्दीतील रस्त्यांना, चौकांना इमारतींना नाव देण्यासाठी एक उपसमिती तयार करण्यात येत असुन सदरील उपसमितीत श्री स. विरेंद्रसिंघ गाडीवाले सभागृहनेता तथा समिती अध्यक्ष, श्री शफी अहेमद कुरैशी उपमहापौर तथा समिती सदस्य, श्री अ. सत्तार अ. गफुर, व श्री चव्हाण आनंदराव, श्री संजय मोरे, श्री किशोर भवरे, श्री बंडु खेडकर विरोधीपक्ष नेता, सौ. जमदाडे करुणा भिमराव समितीचे सदस्य या समितीने प्रस्तावात ज्यांचे नाव द्यावयाचे आहेत त्या व्यक्तींचा अल्प परिचय, त्याचे विविध क्षेत्रात केलेले कार्य, सामाजिक-राजकिय कार्य, शैक्षणिक कार्य, देशासाठी शहरासाठी राहिलेले योगदान ई. कार्याचा उल्लेख नमुद करुन नांवाची छाननी करुन त्याबाबत आपला अंतीम निर्णय मनपासर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव ठेवण्यास मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ४६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांना चौकांना व इमारतींना नांव देण्यासाठी स. सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावात ज्यांचे नाव द्यावयाचे आहेत त्या व्यक्तींचा प्रस्तावात अल्प परिचय, त्याचे विविध क्षेत्रात केलेले कार्य, सामाजिक-राजकिय कार्य, शैक्षणिक कार्य, देशासाठी शहरासाठी राहिलेले योगदान ई. कार्याचा उल्लेख करणे आवश्यक राहील त्यानंतर संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांचा अहवाल मागवुन व यापुर्वी कोणाचे नांव देण्यात आलेले नसेल तरच त्या बाबत निर्णय घेण्यासाठी एक उपसमिती गठीत करण्यात येत असुन सदरील समितीत श्री स. विरेंद्रसिंघ गाडीवाले सभागृहनेता तथा समिती अध्यक्ष, समितीचे सदस्य पुढील प्रमाणे राहील. श्री शफी अहेमद कुरैशी उपमहापौर, श्री अ. सत्तार अ. गफुर, व श्री चव्हाण आनंदराव, श्री संजय मोरे, श्री किशोर भवरे, श्री बंडु खेडकर विरोधीपक्ष नेता, सौ. जमदाडे करुणा भिमराव या सदस्यांनी आपण दिलेला निर्णय मनपा सर्वसाधारण सभेस मान्यतेस्तव ठेवण्यास ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**(१३)**

**<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेले विषय</u>**

**विषय क्र.१**

का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/४०३/१६ दि. ०७.०४.२०१६ अन्वये मराठी नववर्ष गुढीपाडवा हा महाराष्ट्रभर सर्वत्र साजरा करण्यात येतो, त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका इत्यादीचे आयोजन करण्यात येते, त्याच धर्तीवर नांदेड शहरातील सांस्कृतिक परंपरा व सांस्कृतिक भुक भागविणारा पाडवा पहाट हा सांस्कृतिक कार्यक्रम नांदेड महानगरपालिकेतर्फे आयोजित करुन, सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील दिग्गज कलावंतांना आमंत्रित करण्यासाठी महापालिकेतर्फे आर्थिक सहाय्य करावे असे संदर्भ क्र. 01 च्या निवेदनात श्री विजय जोशी, पत्रकार जिल्हा प्रतिनिधी दैनिक सामना, नांदेड यांनी नमुद केलेले आहे. तसेच मा.विरोधीपक्ष नेता, मनपा नांदेड यांनी संदर्भ क्र.02 पत्रानुसार मराठी नव वर्ष गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर मराठमोळा, सांस्कृतिक कार्यक्रम मनपाच्या वतीने आयोजित करुन मानधन उपलब्ध करुन देणेविषयी कळविणे आहे. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे कलम 66 (21), (22), (25), (26) व (41) अन्वये सांस्कृतीक कार्यक्रम/क्रिडा/महिला बालकल्याण व संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली मनपाने तयार असुन ज्यामध्ये कलम 3 मधील मुद्दा क्र.3 अन्वये जास्तीत जास्त रु.1,00,000/- पर्यंतचे अनुदान देण्याचे अधिकार नांवाशमनपा सर्व साधारण सभेस असतील.

त्यान्वये सदर कार्यक्रमासाठी वेळ कमी असल्यामुळे व सर्व साधारण सभेचे आयोजन कार्यक्रमानंतर असल्यामुळे, सदर कार्यक्रमास दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, तसेच मनपाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता रु.1,00,000/- (अक्षरी रुपये

एक लक्ष फक्त) चे आर्थिक अनुदान देण्याविषयी मा.महापौर यांचे संदर्भ क्र.03 च्या अभिप्रायानुसार मान्यता प्रदान केली आहे. तथापि सध्यस्थिती कार्यक्रमाच्या आयोजनासाठी वेळ कमी असल्यामुळे संदर्भ क्र.04 च्या निवेदनानुसार एकुण मानधना पैकी रु- 50,000/- ची अग्रिम रक्कम तात्काळ कार्यक्रमापुर्वी देण्याविषयी विनंती केलेली आहे.त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजक श्री विजय जोशी, जिल्हा प्रतिनिधी, दैनिक सामना, नांदेड यांना एकुण अनुदाना पैकी रुपये 50,000/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) ची अग्रिम रक्कम देण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येते. तसेच उरर्वरीत रुपये 50,000/- ही रक्कम महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेनंतर देण्यात येईल. करिता उक्त नमुद प्रमाणे **पाडवा पहाट - भूपाळी ते भैरवी** या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी वरील प्रमाणे रुपये- 50,000/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) अग्रिम रक्कमेचा धनादेश **श्री विजय जोशी, पत्रकार, जिल्हा प्रतिनिधी, दैनिक सामना, नांदेड** यांचे नावे देण्यात येते त्याची नोंद घेणे बाबत.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. ४७** **ठराव**

का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/४०३/१६ दि. ०७.०४.२०१६ अन्वये मराठी नववर्ष गुढीपाडवा हा महाराष्ट्रभर सर्वत्र साजरा करण्यात येतो, त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका इत्यादीचे आयोजन करण्यात येते, त्याच धर्तीवर नांदेड शहरातील सांस्कृतिक परंपरा व सांस्कृतिक भुक भागविणारा पाडवा पहाट हा सांस्कृतिक कार्यक्रम नांदेड महानगरपालिकेतर्फे आयोजित करुन, सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील दिग्गज कलावंतांना आमंत्रित करण्यासाठी महापालिकेतर्फे आर्थिक सहाय्य करावे असे संदर्भ क्र. 01 च्या निवेदनात श्री विजय जोशी, पत्रकार जिल्हा प्रतिनिधी दैनिक सामना, नांदेड यांनी नमुद केलेले आहे. तसेच मा.विरोधीपक्ष नेता, मनपा नांदेड यांनी संदर्भ क्र.02 पत्रानुसार मराठी नव वर्ष गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर मराठमोळा, सांस्कृतिक कार्यक्रम मनपाच्या वतीने आयोजित करुन मानधन उपलब्ध करुन देणेविषयी कळविणे आहे. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे कलम 66 (21), (22), (25), (26) व (41) अन्वये सांस्कृतीक कार्यक्रम/क्रिडा/महिला बालकल्याण व संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली मनपाने तयार असुन ज्यामध्ये कलम 3 मधील मुद्दा क्र.3 अन्वये जास्तीत जास्त रु.1,00,000/- पर्यंतचे अनुदान देण्याचे अधिकार नांवाशमनपा सर्व साधारण सभेस असतील.

त्यान्वये सदर कार्यक्रमासाठी वेळ कमी असल्यामुळे व सर्व साधारण सभेचे आयोजन कार्यक्रमानंतर असल्यामुळे, सदर कार्यक्रमास दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, तसेच मनपाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता रु.1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त) चे आर्थिक अनुदान देण्याविषयी मा.महापौर यांचे संदर्भ क्र.03 च्या अभिप्रायानुसार मान्यता प्रदान केली आहे. तथापि सध्यस्थिती कार्यक्रमाच्या आयोजनासाठी वेळ कमी असल्यामुळे संदर्भ क्र.04 च्या निवेदनानुसार एकुण मानधना पैकी रु- 50,000/- ची अग्रिम रक्कम तात्काळ कार्यक्रमापुर्वी देण्याविषयी विनंती केलेली आहे.त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजक श्री विजय जोशी, जिल्हा प्रतिनिधी, दैनिक सामना, नांदेड यांना एकुण अनुदाना पैकी रुपये 50,000/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) ची अग्रिम रक्कम देण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येते. तसेच उरर्वरीत रुपये 50,000/- ही रक्कम संबंधीतास देण्यासाठी कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते. करिता उक्त नमुद प्रमाणे **पाडवा पहाट - भूपाळी ते भैरवी** या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी वरील प्रमाणे एकूण रक्कम रुपये- १.००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त) देण्यास ही ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**महापौर** सभेचे कामकाज संपल्यामुळे शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येईल.
शेवटी राष्ट्रगीत म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | .नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. |